MHAH210011752023

## नियमित दिवाणी दावा क्र.१९५/२०२३ मधील निशाणी क्र.५ खालील आदेश

(शितल विरूध्द अलका व ईतर)

वादीने प्रतिवादींविरुध्द प्रस्तुतचा अर्ज, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ३९, नियम १ व २ नुसार तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**वादीचे अर्जातील थोडक्यात कथन खालील प्रमाणे :**

**०२.** वादीने प्रस्तुतचा दावा हा वादमिळकतीचे कोणत्याही मार्गाने हस्तांतरण करू नये असा निरंतर ताकीद मिळण्याकरिता दाखल केला असून, प्रस्तुत दाव्यासोबत वादीने निशाणी क्र.५ अन्वये तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** वादीचे असे म्हणणे आहे की, मौजे हाळगाव हद्दितील शेतजमिन गट नं. ६३४/ब चे क्षेत्र १ हेक्टर ८१ आर, ज्याच्या पुर्वेस, पश्चिमेस, दक्षिणेस व उत्तरेस संपुर्ण गट नंबर हा वादविषय आहे. (सदरच्या मिळकतीस यापुढे “वादमिळकत” म्हणुन संबोधन्यात येते). येणेप्रमाणे वर्णनाची शेतजमिन मिळकतीमधील झाडझुडूप, दगडमाती वगैरे तदंगभुत वस्तुंसह काहीएक राखुन न ठेवता.

**०४.** वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. १ वादीची आई असुन प्रतिवादी क्र. २ व ३ हे सख्खे भाऊ आहेत. दिनांक ०८.०२.२०१५ रोजी वादीचे लग्न झालेले आहे. वादी व प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे वडिल हे सन २००५ साली पुणे येथे उपचारादरम्यान मयत झाले असुन त्यांना वादी व प्रतिवादी हेच वारस आहेत. वादीचे वडिल लक्ष्मण साळुंके यांना मौजे हाळगाव, ता. जामखेड येथे गट क्र. ६३४/ब ही त्यांची खरेदी मालकीची शेतजमिन होती. त्यांच्या मृत्यूनंतर वादी व प्रतिवादींची वारसाहक्काने सातबारा पत्रकी नोंद झालेली आहे.

**०५.** वादीचे पुढे असे कथन आहे की, तिचे वडिल मयत झाले त्यावेळी वादी ही अज्ञान असल्याने वारस नोंद करतेवेळी वादीचे नाव सातबारा पत्रकी अ.पा.क. म्हणुन आई अलका लक्ष्मण साळुंके अशी नोंद केली होती. तदनंतर, वादीने दिनांक २४.०८.२०२१ रोजी तहसिलदार जामखेड यांच्याकडे अर्ज करून वादी सज्ञान झाल्याने अ.पा.क. ची नोंद कमी करणेकामी अर्ज दिला होता. सदर अर्जावर चौकशी करून अर्ज मंजुर करण्यात

आला. वादीचे मयत वडिल लक्ष्मण यांच्या मिळकतीमध्ये वादीचा १/४ असा वारसाहक्काने हिस्सा आहे. वादी व प्रतिवादींची सातबारा पत्रकी १ हेक्टर ८१ आर क्षेत्रात सामाईकात नोंद आहे. वादी व प्रतिवादींमध्ये अद्यापपावेतो सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही. वादीने प्रतिवादींकडे सदर वाटपाबाबत वेळोवेळी मागणी केली असता प्रतिवादींनी वाटपास टाळाटाळ केली. तसेच, दिनांक १३.०६.२०२३ रोजी वादीने प्रतिवादींकडे वाटपाची मागणी केली असता प्रतिवादींनी तिला शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली.

**०६.** वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी हे वादीस तिच्या हिश्याची मिळकत वाटुन देतील याची शास्वती राहिली नाही. म्हणुन, वादीने दिनांक २७.०६.२०२३ रोजी प्रतिवादींना वकिलामार्फत नोटीस देवुन वाटपाची मागणी केली असता प्रतिवादींनी सदर नोटीसला खोट्या आशयाचे उत्तर देवुन वाटप करून देण्यास नकार दिला. म्हणुन, दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादी यांनी वाद मिळकत कोणासही खरेदी, विक्री, गहाण, दान अथवा बक्षिस ईत्यादी मार्गाने हस्तांतरीत करू नये, म्हणून तुर्तातुर्त मनाई हुकम वादीच्या हक्कात मिळावा, अशी विनंती वादीने केली आहे.

**०७.** प्रतिवादी क्र. १ हिस दावा समन्सची बजावणी झाल्यानंतर तिने हजर होवुन निशाणी क्र. २० प्रमाणे तिची कैफियत दाखल केली. सदर अर्जावर तिने म्हणणे दाखल करून निशाणी क्र. ५ वरील अर्जाप्रमाणे दाव्याचा अंतीम निकाल लागेपावेतो दावा मिळकत हस्तांतरीत करणार नसल्याचे तिने नमुद केले. प्रतिवादी क्र. २ व ३ यांना दावा समन्सची बजावणी होवुन देखील ते दाव्यात हजर न झाल्याने दिनांक १८.०४.२०२४ रोजीच्या निशाणी क्र. १ वरील आदेशान्वये प्रस्तुत दावा हा प्रतिवादी क्र. २ व ३ यांच्याविरूद्ध एकतर्फा चालविण्यात आला.

**०८.** वादीच्या कथनांवरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात; त्या प्रत्येक मुद्यांचा निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | वादीच्या हक्कात सकृतदर्शनी केस आहे काय ? | होकारार्थी.. |
| ०२. | न्यायाचा झुकता कौल वादीच्या हक्कात आहे काय ? | होकारार्थी.. |

०३. जर तुर्तातुर्त मनाई हुकुम नाकारला, तर वादीचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल काय ? होकारार्थी..

०४. आदेश काय ? अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणमिमांसा

**०९.** वादीने त्याच्या दाव्याच्या पुष्ठ्यार्थ खालीलप्रमाणे दस्तावेज दाखल केले. वादीने वादमिळकतीच्या गाव नमुना आठ–अ च्या उता–याची प्रत (निशाणी क्र.८) अन्वये, वादमिळकतीच्या सातबारा उता–याची प्रत (निशाणी क्र. ९) अन्वये, गाव नमुना ६ ची प्रत (निशाणी क्र.१०) अन्वये, गाव नमुना सात ची प्रत (निशाणी क्र.११) अन्वये दाखल केले. याउलट, प्रतिवादींतर्फे कोणतेही दस्त दाखल करण्यात आले नाही.

**१०.** मी वादीतर्फे विद्वान वकील श्री. ई. ए. पठाण यांचा युक्तीवाद ऐकला.

## मुद्दे क्र.१ ते ३ करिता:

**११.** मुद्दे क्र.१ ते ३ हे एकमेकांशी सलग्न असल्यामुळे, प्रकरणातील तथ्य व उपलब्ध पुरावा यांची होणारी पुनरावृत्ती टाळण्यासाठी, मी सदर सर्व मुद्दे याठिकाणी विवेचणासाठी एकत्रीतपणे घेतले आहेत.

**१२.** वादीचे विद्वान वकील श्री. पठाण यांनी असा युक्तीवाद मांडला की, वादमिळकत ही वादीची व प्रतिवादी क्र. २ व ३ यांची वडिलोपार्जीत मिळकत असुन वादी व प्रतिवादींची वादमिळकतीमध्ये सामाईकात वारसाहक्काने सातबारा पत्रकी नोंद लागलेली आहे. प्रतिवादी क्र. २ व ३ हे वादमिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे, वादीच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकूम पारित व्हावा, अशी त्यांनी विनंती केली.

**१३.** वादीने अभिलेखावर वादमिळकती बाबतचा सातबारा उतारा (निशाणी क्र.९) व फेरफार क्र. ४१२८ उतारा (निशाणी क्र.१०) दाखल केला असुन त्यानुसार वादमिळकतीमध्ये वादीच्या नावाची नोंद असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. तसेच, वादमिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जीत सामाईक मिळकत असल्याचे देखील प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे, वादी ही प्रतिवादींसह वाद मिळकतीची मालक असल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न होते. वादमिळकत ही विक्री करणार नसल्याचे प्रतिवादी क्र. १ ने प्रस्तुत अर्जावर म्हणणे सादर करून वाद मिळकत ही प्रस्तुत प्रस्तुत दाव्याच्या

निकालापर्यंत विकणार नसल्याची हमी दिली आहे. तसेच, प्रतिवादी क्र. २ व ३ यांना दाव्याचा समन्स व प्रस्तुत अर्जाची नोटीस प्राप्त होवुन देखील न्यायालयासमक्ष हजर झाले नाहीत व अशा परिस्थीतीत प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी वाद मिळकत विक्री केल्यास वादीचे अपरीमीत असे नुकसान होणार आहे.

**१४.** एकंदरीत सर्व बाबींचा सारासार विचार करता आणि दाव्याचे स्वरूप पाहता, वादीने तिच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस असल्याचे आणि न्यायाचा झुकता कौल देखील वादीच्या बाजुने असल्याचे सिध्द केलेले आहे. त्यामुळे, वर उल्लेखीत केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूम वादीच्या हक्कात पारीत न केल्यास वादीचे कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे. याउलट, प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणुन मी, मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवितो.

## मुद्दा क्र.४ करिता:

**१५.** उपरोक्त केलेल्या विवेचनानुसार व मी वरील नोंदविलेल्या मुद्दा क्र. १ ते ३ च्या होकारार्थी निष्कर्षावरून वादीचा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज मंजुर करणे योग्य व उचित होईल. सबब, मुद्दा क्र. ४ करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. २ व ३ यांना निर्देष देण्यात येतो की, प्रस्तूतचा दावा अंतिमतः निर्गत होईपर्यत, त्यांनी स्वतः अथवा इतरांमार्फत वादमिळकत कोणासही विक्री, गहान, दान अथवा बक्षिस करू नये, अथवा त्यावर त्रयस्थ बोजा निर्माण करू नये.

३. सदरच्या आदेशाची बजावणी ही प्रतिवादी क्र. २ व ३ यांच्यावर तात्काळ करण्यात यावी, असा वादीस आदेश देण्यास येतो.

Digitally signed by VAIBHAV VASANTRAO JOSHI
Date: 2024.07.23 17:40:31 +0630

दिनांकः २३.०७.२०२४

**(व्ही. व्ही. जोशी)**
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.

**ENDORSEMENT**

| | | |
|---|---|---|
| Case Argued on | : | 23.07.2024 |
| Order prepared on | : | 23.07.2024 |
| Transcription Ready on | : | 23.07.2024 |
| Judgment checked and signed off | : | 23.07.2024 |

**प्रमाणपत्र**

असे खात्रीपूर्वक कथन करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मूळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

टंकलीखीत : आर. बी. बेडके, लघुलेखक श्रेणी–३.